वर्ष-१० | अंक-०६ | मुंबई, मंगळवार, २६ डिसेंबर २०२३ ते १ जानेवारी २०२४ | पृष्ठ-४ | मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

# पोलीस बातमी पत्र

# POLICE BATMI PATRA

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 9 हाडांच्या आरोग्यासाठी तुमच्या आहारात कॅल्शियम युक्त सुका मेवा

3 → धारेवर धारावी!

अवैधपणे वास्तव्य करणाऱ्या बांगला ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## कचऱ्याची परिसरातच लावली जाणार विल्हेवाट; ठाणे महापालिकेचे विविध भागात छोटे प्रकल्प उभारणीसाठी प्रयत्न



**■ठाणे। प्रतिनिधी,**

महापालिका क्षेत्रात दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी डायघर येथे कचऱ्यापासून वीज निर्मितीचा प्रकल्प उभारण्यापाठोपाठ आता पालिकेने शहराच्या विविध भागात कचरा विल्हेवाट प्रकल्प उभारणीवर लक्ष केंद्रीत केले आहे. कोलशेत आणि गायमुख भागात कचऱ्यापासून खतनिमीर्तीचा प्रकल्प उभारणीची कामे सुरू आहेत. या प्रकल्पामध्ये दररोज १३० टन कचऱ्याची विल्हेवाट लावली जाणार आहे. यातील कोलशेतचा प्रकल्प येत्या १५ दिवसांत तर, गायमुखचा प्रकल्प दोन ते तीन महिन्यात कार्यान्वित होईल.

तसेच या प्रकल्पांमुळे कचऱ्याची परिसरातच विल्हेवाट लावली जाणार असल्याने कचरा वाहतूक खर्चात बचत होईल, असा दावा प्रशासनाकडून करण्यात येत आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात दररोज एक हजार टनाच्या आसपास कचरा निर्माण होतो. त्यापैकी ४५० टन कचरा हा ओला कचरा असतो. ठाणे महापालिकेची स्वतःची कचराभुमी नाही. यामुळे दिवा, त्यानंतर शहराबाहेर म्हणजेच भांडार्ली येथे कचरा टाकला जात होता. अखेर पालिकेने डायघर भागात कचऱ्यापासून वीज निर्मितीचा प्रकल्प उभारून तिथे शहरातील कचरा नेण्यास सुरूवात केली आहे. असे असले तरी शहरात दररोज शंभर किलो कचरा निर्माण करणारी गृहसंकुले आणि आस्थापनांनी कचरा विल्हेवाट प्रकल्प उभारावेत, असे प्रयत्न प्रशासनाकडून सुरू आहेत. त्याचबरोबर शहराच्या विविध भागात छोटे-छोटे कचरा विल्हेवाट प्रकल्प पालिकेकडून उभारण्यात येत आहेत.

घोडबंदर भागातील हिरानंदानी इस्टेट भागात ३५ टन कचऱ्यावर प्रक्रीया केली जात आहे. उथळसर येथे १० टन, कौसा येथे १० टन, कळवा रुग्णालय येथे २५ टन कचरा विल्हेवाट प्रकल्प असून याठिकाणी कचऱ्यापासून खत निर्मीती केली जात आहे.




## राज्यातील सर्वोत्कृष्ट कृषी महाविद्यालय चंद्रपुरातील मूल येथे उभारणार: वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

**■चंद्रपूर। प्रतिनिधी,**


पारंपरिक शेतीला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत आज शेतीमध्ये नावीन्यपूर्ण प्रयोग होत आहेत. या सोबतच शेती विषयातील अत्याधुनिक शिक्षण घेत तरुणाई नव्याने शेती क्षेत्राकडे वळतांनाचे चित्र आहे. यांच उद्देशाने चंद्रपूर जिल्ह्यातील स्थानिक तरुणांचा शेतीकडे कल वाढावा आणि कृषी क्षेत्रातील तांत्रिक आणि सखोल ज्ञान तरुणांना मिळावे या उद्देशाने विशेष प्रयत्न राबविण्यात येत आहे. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून मूल येथे कृषी महाविद्यालय उभे करण्याचा संकल्प राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केला आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी हे महाविद्यालय राज्यातील सर्वोत्कृष्ट राहणार असल्याची ग्वाही देखील सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. ते नागपुरात बोलत होते.

फेब्रुवारी 2019 मध्ये मिळाली होती मान्यता अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अंतर्गत मूल येथे शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्यास 28 फेब्रुवारी 2019 मध्ये मान्यता देण्यात आली. त्यानुसार आतापर्यंत 35 कोटी एवढे अनुदान विद्यापीठास वितरीत करण्यात आले.



## श्रीमंतांना फसवणाऱ्या 'हनी ट्रॅप' टोळीचा पदार्फाश, फेसबुकवरून मैत्री आणि कोट्यावधींची वसुली

**■वसई। प्रतिनिधी,**



प्रेमाच्या जाळ्यात ओढून वाटेल ते करून घेण्याचा मधुजाल अर्थात हनी ट्रॅप प्रकारात भले भले फसत असतात. अशाच हनीट्रॅपचा वापर करून फेसबुकवरून श्रीमंत व्यापारी, बिल्डरांना जाळ्यात ओढून त्यांच्याकडून लाखोंची वसुली करर्णाया टोळीचा पदार्फाश वसईतील वालीव पोलिसांनी केला आहे. या प्रकरणात एका तरुणीसह दोघांना बेड्या घातल्या आहेत. त्यांनी अशाप्रकारे अनेक गुन्हे केल्याची माहिती पोलिसांनी दिली. यातील फियार्दी ५५ वर्षांचा बिल्डर आहे. त्याची फेसबुकवर साहिबा बक्षी नामक २९ वर्षीय तरुणीची ओळख झाली. बिल्डर त्या सुंदर तरुणीच्या जाळ्यात फसला. बिल्डर तिच्या घरी तिला भेटायला जाऊ लागला. काही दिवसांनी तिने गर्भवती असल्याचे सांगितले. हा प्रकार तिच्या दोन भावांना कळला. मनिष सेठ (४८) आणि नफिस शेख (२९)नावाच्या भावांनी माज्या बहिणीशी संबंध ठेवले तिला गर्भवती केलं असं सागून धमकावलं. हे प्रकरण मिटविण्यासाठी तब्बल २ कोटी मागितले. बिल्डर घाबरला. त्याने ५० लाख देण्याचे ठरले आणि त्यापैकी १९ लाख रुपये दिले. या टोळीची पहिली योजना यशस्वी झाली होती. पुन्हा दुर्सया जाळ्यात फसवले.. या प्रकरणातून सुटका झाल्याने बिल्डरचा जीव भांड्यात पडला होता. तेव्हा साहिबा आणि तिच्या दोन कथित भावांनी आणखी एक जाळं फेकलं. बिल्डरची जागा एका प्रकल्पात जाणार होती. त्यासाठी अधिकार्यांची सेटींग करून २५ कोटी मिळवून देतो असे सांगितले. त्यासाठी खोटे नकाशे वगैरे तयार केले. बिल्डरने त्यांच्यावर विश्वास ठेवून १७ लाख रुपये दिले. मात्र यानंतर या त्रिकुट पसार झाले. तेव्हा बिल्डरला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. या प्रकरणी वालीव पोलिसांनी तिन्ही आरोपींच्या विरोधात खंडणी, फसणुकीच्या कलम ३८४, ३८५, ३८८, ३८९, ४२०, ४०६, ४११, १२० (ब)३४ अन्वये गुन्हे दाखल केले आहे. आरोपींच्या शोधासाठी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस सचिन सानप यांच्या नेतृत्वाखाली पथक तयार करून शोध सुरू केला. यानंतर एका आरोपीला वज्रेश्वरी येथून गुजरात आणि राजस्थान येथून तिन्ही आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून खंडणीच्या आधारे उकळलेले ७ लाख ८८ हजार रुपये तसेच दोन गाड्या आदी मिळून २२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.

## राज्यातील 80 वर्षपेक्षा जास्त वयोवृद्ध निवृत्तीधारकांना मोठा दिलासा, केंद्र सरकारप्रमाणे मोबदला मिळणार



**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील अतीवयोवृद्ध निवृत्ती धारकाना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या आणि ज्यांचं वय 80 वर्षापेक्षा जास्त आहे अशा निवृत्तीधारकांना केंद्र सरकार प्रमाणे मोबदला मिळणार आहे. याबाबतचा निर्णय राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाला.

कोणाला काय मोबदला मिळणार?

- वय- 80 वर्ष ते 85 वर्ष आहे त्यांना केंद्राप्रमाणे 20 टक्के वाढीव मोबदला मिळणार.
- 85 वर्ष ते 90 वर्षे निवृत्ती धारकांना 30 टक्के वाढीव मोबदला मिळणार.
- 90 वर्ष ते 95 वर्षे निवृत्ती धारकांना 40 टक्के वाढीव मोबदला मिळणार.
- 95 वर्ष ते 100 वर्षे निवृत्ती धारकांना 50 टक्के वाढीव मोबदला मिळणार.
- 100 आणि त्यापुढील निवृत्ती धारकांना 100 टक्के वाढीव मोबदला मिळणार. जुन्या पेन्शन संदर्भात, येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात निर्णय
- राज्यातील शासकीय आणि निमशासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करण्याबाबत नेमण्यात आलेल्या समितीने अहवाल सादर केला असून त्याचा अभ्यास केला जाईल आणि येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यावर अंतिम निर्णय घेतला जाईल असं राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. राज्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी यासाठी जवळपास 17 लाख कर्मचाऱ्यांनी संप पुकारला होता. त्यानंतर येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यावर अंतिम निर्णय घेण्यात येईल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलं.

काय म्हणाले मुख्यमंत्री?

जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत सुबोध कुमार समिती रिपोर्ट सादर केला. अतिरिक्त मुख्य सचिव वित्त आणि सेवा याचा अभ्यास करेल. प्राप्त अहवाल आणि परिस्थिती यावर अधिवेशनात निर्णय घेतला जाईल.

## फसवणुकीच्या मार्गाने गेलेली सुमारे 356000 रुपये रक्कम परत करण्यास मोठ्या शिताफीने पोलिसांना मिळाले यश

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील उत्तम परिसरातील महिला नामे जेनीफर पाटील यांना त्यांचे मोबाईलवर एक्सीस बँकेमधून बोलत असल्याचे भासवून तक्रारदार यांचेकडून बँकेची सर्व माहिती प्राप्त करून घेतली. तक्रारदार यांना एनिडेक्स अप डाऊनलोड करण्यात सांगून त्याचा एक्सेस घेण्यात आला. त्यानुसार तक्रारदार यांचे नावे असलेली एफडी विड्रॉवल करून रक्कम तक्रारदार यांचे खात्यावर मुळ खात्यावर घेवून पुढे वळती करण्यात आलेबाबत तक्रार सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार प्राप्त होती.

**(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्रमांक – ३०१०–बी/२०२३ दि.१६/१२/२०२३)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांचे फसवणूक रक्कमेबाबत गं० ?8४।॥ उेद्या / ५६ 13811ः यांना तात्काळ पत्रव्यवहार व पाठपूरावा करुन नमूद फसवणूक रक्कम थांबविण्यात आली व पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली. तसेच उर्वरीत रक्कम ज्या बँक खात्यावर वळती झालेली आहे. त्या बँक खात्याबाबत माहिती प्राप्त करण्यात आली आहे अधिक तपास सुरु आहे.

**अशा प्रकारची फसवणक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी... .**

- बँकेकडून बँक खातेधारकाला कोणतीही वैयक्तीक माहिती विचारली जात नाही.
- Bank Debit Card Number, CVV, Pin, OTP, etc... संदभार्तील माहिती कोणाकडेही उघड करू नये
- आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.
- फसव्या एमएसएसला, कॉल प्रतिसाद देवू नका.
- आपल्या मोबाईलमध्ये रिमोट एक्सेस अप्लीकेशन डाऊनलोड करून कोणताही नंबर देवू नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करू नये.
- क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डद्वारे फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा. मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे, मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/ प्रसाद शेनोळकर, मपोअं/१३०८७ अमिना पठाण, मपोअं/ १६१०६ सुवर्णा माळी, पोअं/२२००३ कुणाल सावळे यांनी पार पाडली आहे.

सायबर पोलीस ठाणे व्हॉट्सअप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५ सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- cybercrime.mb.vv@mahapolice.gov.in

## दहिसर वर्सोवा मार्गासाठी सहा कंत्राटदार निश्चित; सहापैकी दोन टप्प्यांची कामे रस्त्याच्या कंत्राटदाराला

**■मुंबई। प्रतिनिधी,**

वर्सोवा ते दहिसर या सागरी किनारी रस्ता प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामासाठी सहा कंत्राटदार अखेर निश्चित करण्यात आले आहेत. त्यात लार्सन एण्ड टुब्रो, जे कुमार- एनसीसी, मेघा इंजिनिअरींग, एपको इन्फ्राटेक प्रा. लि. या कंपन्यांना ही कामे देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. एकूण १८.४७ किमी हा मार्ग असून याकरीता १६,६२१ कोटींचा खर्च अंदाजित आहे. यामध्ये चारकोप ते माईंडस्पेस मालाड पर्यंत समांतर बोगदा खणण्याचे काम मेघा इंजिनिअरींगला देण्यात आले असून ही कंपनी पालिकेच्या वादग्रस्त रस्ते कंत्राटातील कंत्राटदार कंपनी आहे. या कंपनीलाही रस्ते काम रखडवल्यामुळे यापूर्वी दंड करण्यात आला होता.



सागरी किनारा मार्ग या प्रकल्पाचे काम प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल ते वांद्रे वरळी सी लिंकच्या दक्षिण टोकापर्यंतचे काम सध्या मुंबई महानगरपालिकेतर्फे सुरु आहे. या मागार्ची लांबी १०.५८ किलोमीटर आहे. हे काम ८२ टक्के पूर्ण झाले असून फेब्रुवारी या प्रकल्पाचा काही भाग सुरू होऊ शकणार आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाने या मागार्चा जो भाग पश्चिम उपनगरात आहे त्याकरीता निविदा प्रक्रिया राबवायला सुरूवात केली होती. ऑगस्ट महिन्यात पूल विभागाने या कामासाठी सहा टप्प्यात निविदा मागवल्या होत्या.

त्याकरीता चार इच्छुक कंपन्यांनी निविदा भरल्या होत्या.या चार कंपन्यांना या सहा टप्प्यातील कामांचे कंत्राट देण्यात आले आहे. त्यातील मेघा इंजिनिअरींग आणि एनसीसी यांच्याकडे रस्ते कॉंक्रीटीकरणाची कामेही आहेत. तर एलएण्डटी यां कंपनीकडे सागरी किनारा मार्गाच्या एका टप्प्याचे काम सुरू आहे. जे कुमार या कंपनीला गोरेगाव मुलुंड जोडरस्त्याचे कामे देण्यात आले आहे.

खर्च २४ हजार कोटींवर जाणार वर्सोवा ते दहिसर या मागार्साठी सहा भाग करण्यात आले आहेत. या प्रत्येक टप्प्याचे काम सुमारे अडीच हजार कोटींचे आहे. या मार्गाच्या कामासाठी १६,६२१ कोटींचा खर्च अंदाजित आहे. तर सर्व कर धरून हा प्रकल्पा२४ हजार कोटींपर्यंत जाणार आहे. हे काम चार वर्षात पूर्ण करण्याचे उद्दीष्टय पालिका प्रशासनाने ठरवले आहे. यापैकी बांगूर नगर ते माईंडस्पेस मालाड या दुसऱ्या गोरेगाव मुलुंड जोड रस्त्याला ४.४६ किमीचा एक जोड (कनेक्टर) देण्यात येणार आहे. त्यामुळे हा टप्पा महत्त्वाचा मानला जात आहे. या संपूर्ण मार्गावर पूल, बोगदा, उन्नत मार्ग अशी गुंतागुंतीची रचना आहे. दरम्यान, दहिसर भाईंदर उन्नत रस्त्यासाठीही कंत्राटदार निश्चित करण्याची प्रक्रियाही पूर्ण झाली आहे. त्यामुळे भविष्यात हे सर्व टप्पे पूर्ण झाल्यानंतर मरीन ड्राईव्ह येथून सागरी किनारा मार्गावरून थेट भाईंदर पश्चिमपर्यंत जाता येणार आहे.

या प्रकल्पाच्या सहा कंत्राटदारापैकी मेघा इंजिनिअरींग ऍण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीला पश्चिम उपनगरातील रस्त्यांची कामे देण्यात आली होती. रस्त्यांची कामे रखडवल्यामुळे पालिकेने एप्रिल २०२३ मध्ये तीन कंपन्यांना दंड केला होता. त्यात या कंपनीचाही समावेश होता व या कंपनीला साडे तीन कोटींची दंड करण्यात आला होता.

असे आहेत टप्पे आणि कंत्राटदार

पॅकेज ए....वसोर्वा ते बांगूर नगर....एपको इन्फ्राटेक प्रा. लि.

पॅकेज बी .... बांगूर नगर ते माईंडस्पेस मालाड.....जे कुमार-एनसीसी,

पॅकेज सी .... माईंडस्पेस मालाड ते चारकोप उत्तरेकडे जाणारा बोगदा .....मेघा इंजिनिअरींग ऍण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड

पॅकेज डी.... चारकोप ते माईंडस्पेस दक्षिणेकडे जाणारा समांतर बोगदा .....मेघा इंजिनिअरींग ऍण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड

पॅकेज ई ... चारकोप ते गोराई ...लार्सन एण्ड टुब्रो

पॅकेज एफ.....गोराई ते दहिसर ....एपको इन्फ्राटेक प्रा. लि.

# पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार, २६ डिसेंबर २०२३ ते १ जानेवारी २०२४




## रिकाम्या पोटी एक ग्लास नारळ पाणी पिण्याचे आरोग्य फायदे

नारळ पाणी अतिशय चवदार आणि आरोग्यदायी आहे. हे उष्णतेपासून आराम देण्याचे काम करते. हे तुम्हाला ऊर्जा प्रदान करण्यात मदत करते. हे तुमचे मन आणि शरीर ऊजार्वान ठेवते. नारळाच्या पाण्यात कमी प्रमाणात कॅलरीज असतात आणि भरपूर पोषक असतात. रिकाम्या पोटी सेवन केल्यावर ते सुपर ड्रिंकचे काम करते. हे शरीराला डिटॉक्स करण्याचे काम करते आणि तुम्हाला हायड्रेट ठेवते. रिकाम्या पोटी याचे सेवन केल्याने शरीराला अनेक फायदे होतात. चला जाणून घेऊया त्याचे आरोग्य फायदे.

ड्ट वजन कमी करण्यास मदतः नारळाच्या पाण्यात पोटॅशियम असते. त्यात बायोएक्टिव्ह एंजाइम असतात. हे शरीरातील मेटाबॉलिज्म वाढवण्याचे काम करतात. हे पाणी प्यायल्याने जास्त कॅलरी बर्न होण्यास मदत होते. त्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. हे तुम्हाला फ्रेश ठेवते.

ड्ट तुम्हाला हायड्रेट ठेवतेः नारळाच्या पाण्यात कॅलरी आणि कार्बोर्हायड्रेट्स कमी असतात. त्यात पोटॅशियम, सोडियम आणि मॅग्नेशियम सारखे पोषक घटक असतात. हे पाणी आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. वर्कआउट आणि व्यायाम करताना तुम्ही नारळ पाणी पिऊ शकता. हे तुम्हाला हायड्रेट ठेवण्यासाठी काम करते. नारळ पाणी थकवा, आळस, अशक्तपणा आणि चक्कर यासारख्या समस्यांपासून आराम देते.

ड्ट खराब कोलेस्ट्रॉल काढून टाकतेः नारळाचे पाणी वाढलेले कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्याचे काम करते. हे हृदयाशी संबंधित समस्यांपासून संरक्षण करण्यास मदत करते.

ड्ट किडनी स्टोन काढून टाकतेः किडनी स्टोन टाळण्यासाठी हायड्रेटेड राहणे फार महत्वाचे आहे. अशा परिस्थितीत तुम्ही तुमच्या आहारात नारळ पाण्याचा समावेश करू शकता. हे शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करेल. तसेच किडनी स्टोन काढण्यास मदत होते.

ड्ट निरोगी त्वचा प्रदान करतेः नारळ पाण्यात प्रतिजैविक गुणधर्म असतात. हे मुरुमांविरुद्ध लढण्यास मदत करतात. नारळाच्या पाण्याचे सेवन केल्याने शरीराला मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानीपासून संरक्षण मिळते. निरोगी त्वचेसाठी तुम्ही या पाण्याचे नियमित सेवन करू शकता.

ड्ट उच्च रक्तदाब नियंत्रित करतेः नारळाच्या पाण्याचे सेवन उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. यामध्ये व्हिटॅमिन सी, पोटॅशियम आणि मॅग्नेशियम सारखे पोषक घटक असतात. हे उच्च रक्तदाब नियंत्रित करते.

## 9 हाडांच्या आरोग्यासाठी तुमच्या आहारात कॅल्शियम युक्त सुका मेवा

संपूर्ण आरोग्यासाठी मजबूत हाडे आवश्यक आहेत आणि हाडांच्या आरोग्यासाठी मुख्य पोषक घटक कॅल्शियम आहे. दुग्धजन्य पदार्थ अनेकदा कॅल्शियमशी संबंधित असले तरी, सुक्या फळांसह अनेक वनस्पती-आधारित स्रोत आहेत, जे तुम्हाला तुमच्या कॅल्शियमच्या गरजा पूर्ण करण्यात मदत करू शकतात.

हे कॅल्शियम युक्त सुकामेवा तुमच्या आहारात समाविष्ट करणे तुम्हाला हे महत्त्वाचे खनिज पुरेशा प्रमाणात मिळत असल्याची खात्री करण्याचा एक स्वादिष्ट आणि सोयीचा मार्ग असू शकतो. लक्षात ठेवा संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि पुरेशा प्रमाणात व्हिटॅमिन डी घेणे देखील मजबूत आणि निरोगी हाडे राखण्यासाठी महत्वाचे आहे.

तुमच्या कॅल्शियमचे प्रमाण वाढवण्यासाठी आणि मजबूत हाडांना आधार देण्यासाठी तुमच्या आहारात सुका मेवा एक उत्कृष्ट जोड असू शकतो. येथे काही कॅल्शियम युक्त ड्राय फ्रूट्स आहेत जे हाडे मजबूत करण्यासाठी आणि तुम्हाला निरोगी बनवण्यासाठी योगदान देऊ शकतात.



1. बदाम हा कॅल्शियमचा उत्कृष्ट स्रोत आहे, ज्यामध्ये प्रति 28 ग्रॅम सुमारे 76 मिलीग्राम कॅल्शियम असते. ते व्हिटॅमिन ई आणि निरोगी चरबी सारख्या आवश्यक पोषक तत्वांनी देखील भरलेले आहेत, ज्यामुळे ते तुमच्या आहारात एक उत्तम भर घालतात.

2. अंजीर हे आणखी एक कॅल्शियम युक्त ड्राय फ्रूट आहे, जे प्रति 100 ग्रॅम सुमारे 55 मिलीग्राम कॅल्शियम प्रदान करते. ते आहारातील फायबर आणि नैसर्गिक गोडपणा देखील देतात.

3. खजूर केवळ गोड आणि रुचकर नसतात तर प्रति 100 ग्रॅम सुमारे 64 मिलीग्राम कॅल्शियम देखील प्रदान करतात. तुमचे कॅल्शियमचे सेवन वाढवण्यासाठी हे उत्तम स्नॅक पर्याय आहेत.

4. प्लम्स त्यांच्या पाचक फायद्यांसाठी ओळखले जातात आणि त्यात प्रति 100 ग्रॅम सुमारे 43 मिलीग्राम कॅल्शियम असते. आपल्या आहारात अधिक कॅल्शियम जोडण्याचा ते एक स्वादिष्ट मार्ग असू शकतात.

5. तीळः या लहान बियांमध्ये कॅल्शियम भरपूर असते, ज्यामध्ये प्रति 100 ग्रॅम सुमारे 989 मिलीग्राम कॅल्शियम असते. कॅल्शियम वाढवण्यासाठी तुम्ही त्यांना सॅलड्स किंवा दहीवर शिंपडू शकता किंवा विविध पाककृतींमध्ये जोडू शकता.

6. मोहरीच्या बियाः 100 ग्रॅम सूर्यफुलाच्या बियांमध्ये सुमारे 120 मिलीग्राम कॅल्शियम असते. ते केवळ कॅल्शियमचे स्त्रोत नाहीत तर निरोगी चरबी आणि प्रथिने देखील देतात.

7. पिस्ता हा एक स्वादिष्ट आणि पौष्टिक स्नॅक आहे जो प्रति 100 ग्रॅम सुमारे 131 मिलीग्राम कॅल्शियम प्रदान करतो, ज्यामुळे मजबूत हाडांसाठी एक उत्कृष्ट पर्याय बनतो.

8. अक्रोडः जरी इतर काही सुक्या मेव्यांप्रमाणे त्यात कॅल्शियमचे प्रमाण जास्त नसले तरी, अक्रोड अजूनही प्रति 100 ग्रॅम सुमारे 98 मिलीग्राम कॅल्शियम प्रदान करते. ते ओमेगा -3 फॅटी ॲसिड आणि इतर पोषक तत्वांनी समृद्ध आहेत.

9. ब्राझील नट हे सेलेनियमच्या सर्वोत्तम स्त्रोतांपैकी एक आहेत, परंतु त्यामध्ये प्रति 100 ग्रॅम सुमारे 160 मिलीग्राम कॅल्शियम देखील असते. हाडांचे आरोग्य राखण्यासाठी तुमच्या आहारात या नटांचा समावेश केला जाऊ शकतो.

तुमच्या कॅल्शियमचे प्रमाण वाढवण्यासाठी आणि मजबूत हाडांना आधार देण्यासाठी तुमच्या आहारात सुका मेवा एक उत्कृष्ट जोड असू शकतो. या कॅल्शियम-समृद्ध पर्यायांच्या विविधतेचा समावेश करून, तुम्ही हाडांचे चांगले आरोग्य आणि एकूणच कल्याण वाढवू शकता.

## सुपरफूड अंजीर : अंजीरचे फायदे



अंजीर, सामान्यतः अंजीर म्हणून ओळखले जाणारे, हे एक लज्जतदार फळ आहे जे केवळ त्याच्या चवदार चवसाठीच नाही तर ते अनेक आरोग्य फायद्यांसाठी देखील आहे. मध्य पूर्व आणि पश्चिम आशियातील मूळ, अंजीरचा प्राचीन काळापासूनचा एक समृद्ध इतिहास आहे, त्याचे पौष्टिक मूल्य आणि औषधी गुणधर्मांसाठी त्याचे कौतुक केले जाते. हा लेख आपल्या आहारात अंजीर समाविष्ट करण्याचे असंख्य फायदे शोधून काढतो, हे फळ संपूर्ण आरोग्यासाठी कसे योगदान देऊ शकते यावर प्रकाश टाकतो.

वजन कमी करण्यास मदत करतेः अंजीरच्या फायबरयुक्त स्वभावामुळे तृप्तता वाढते, ज्यामुळे व्यक्तींना दीर्घकाळ पोट भरल्यासारखे वाटते. या वैशिष्ट्यामुळे अंजीर त्यांच्या वजनाचे व्यवस्थापन करण्याचे लक्ष्य असलेल्यांसाठी एक उत्कृष्ट स्नॅक पर्याय बनते. समतोल आहारात त्यांचा समावेश केल्याने आवश्यक पोषक तत्वे प्रदान करताना वजन व्यवस्थापनाच्या उद्दिष्टांना समर्थन मिळू शकते.

हृदयाचे आरोग्य प्रवर्तकः अंजीरमधील पोटॅशियम घटक रक्तदाब पातळी नियंत्रित करण्यास मदत करून हृदयाच्या आरोग्यास हातभार लावतात. याव्यतिरिक्त, अंजीरमध्ये असलेले फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यात भूमिका बजावतात, ज्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांचा धोका कमी होतो. हृदय-निरोगी आहारामध्ये त्यांचा समावेश करणे हा हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्यासाठी एक सोपा परंतु प्रभावी उपाय असू शकतो.

निरोगी दृष्टी वाढवतेः अंजीरमध्ये बीटा-कॅरोटीन सारखी संयुगे असतात, जी शरीरात व्हिटॅमिन ए मध्ये रूपांतरित होतात. डोळ्यांचे इष्टतम आरोग्य राखण्यासाठी व्हिटॅमिन ए आवश्यक आहे आणि वय-संबंधित मॅक्युलर ऱ्हास टाळण्यास मदत करू शकते. आपल्या आहारात अंजीर समाविष्ट केल्याने निरोगी दृष्टी टिकवून ठेवण्यास मदत होते.

रक्तातील पीएच संतुलित ठेवतेः अंजीर शरीरावर अल्कलायझिंग प्रभाव टाकतो, ज्यामुळे रक्तातील पीएच पातळी संतुलित राहण्यास मदत होते. किंचित अल्कधर्मी वातावरण राखणे हे विविध आरोग्य फायद्यांशी संबंधित आहे, ज्यामध्ये उर्जा पातळी सुधारणे आणि विशिष्ट रोगांची कमी संवेदनशीलता समाविष्ट आहे.

हाडांचे आरोग्य समर्थनः अंजीरमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि मॅग्नेशियम सारखी आवश्यक खनिजे असतात, जी मजबूत आणि निरोगी हाडे राखण्यासाठी आवश्यक असतात.

## छातीत जमा झालेला कफ झटक्यात बाहेर काढण्याचे सोपे घरगुती उपाय

हिवाळ्यात इम्यूनिटी सिस्टीम कमजोर झाल्याने इन्फेक्शन आणि आजारांचा धोका वाढतो. हेच कारण आहे की, जास्तीत जास्त लोक या दिवसात सर्दी, खोकला आणि घशात खवखव या समस्यांनी पीडित असतात. सगळ्यात जास्त त्रास देतो घशात आणि छातीत जमा कफ. छातीत कफ जमा झाल्याने भयंकर खोकला येतो आणि सोबतच घसाही दुखू लागतो.

आल्याच्या मदतीने काढा कफ - आल्याचा वापर तुम्ही कफची समस्या दूर करण्यासाठी करू शकता. यात अँटी-इंफ्लामेटरी प्रॉपर्टी असते. याने मळमळ आणि वेदनेचीही समस्या होऊ शकते. काही रिसर्चमधून समोर आलं आहे की, आल्यामधील अँटी-इंफ्लामेटरी तत्वमुळे एअरवेज मेंबरेनमध्ये आराम मिळतो. ज्यामुळे कफची समस्या कमी होते. कफची समस्या असेल तर आल्याचा चहा सुद्धा फायदेशीर ठरतो. एक कप गरम पाण्यात २० ते ४० ग्रॅम आलं बारीक करून टाकून चहा तयार करा. सोबतच लिंबाचा रस आणि मधही मिश्रित करू शकता.



इतर पेय-पदार्थ - जर तुम्हाला कफ आणि खोकल्याची समस्या असेल तर तरल पदार्थांचं सेवन करताना काळजी घ्यावी. रिसर्चमधून समोर आले आहे की, रूम टेम्प्रेचरमध्ये तरल पदार्थ सेवन केल्याने कफ आणि खोकल्याची समस्या कमी होऊ शकते. ज्या लोकांना फ्लूची समस्या असेल त्यांनी तरल पदार्थ हलके गरम करून खावेत. सोबतच पेयांमध्ये हर्बल चहा, ब्लॅक टी, गरम पाणी आणि गरम फ्रूट ज्यूसचा समावेश करावा.

कफ काढण्याचा उपाय स्टीम - कोरडा कफ असेल तर अधिक प्रमाणा म्युकस तयार होतो. अशात कफपासून सुटका मिळवायची असेल तर स्टीम घेणं चांगलं ठरू शकतं. स्टीम घेतल्यानंतर डिहायड्रेशनपासून बचाव करण्यासाठी एक ग्लास पाणी प्यावे. एका भांड्यातील पाण्यात हर्ब किंवा एसेंशिअल ऑइल जसे की, नीलगिरी किंवा रोजमेरी ऑइलचे काही थेंब टाकावे. स्टीम घेताना काही सेकंदाचा ब्रेकही घ्यावा नाही तर स्कीन बर्नची समस्या होऊ शकते.

मधाचा वापर - कफ काढण्यासाठी तुम्ही मधाचा देखील वापर करू शकता. एका रिसर्चनुसार, औषधांपेक्षा मध अधिक प्रभावी ठरतं. यासाठी दोन चमचे मध हर्बल टी किंवा गरम पाण्यातून घ्या. मधात अँटी-बायोटिक गुण असतात. याने घशाला आराम मिळतो. सोबतच लिंबाचा रस घशाची खवखव कमी करण्यास मदत करतो.

पेपरमिंटचा वापर - कफ दूर करण्यासाठी तुम्ही पेपरमिंटचा देखील वापर करू शकता. पेपरमिंटची पाने म्हणजे पुदीन्याची पाने आपल्या हीलिंग तत्वांसाठी प्रसिद्ध आहेत. यातील मेंथॉल घशाची खवखव कमी करतं आणि याने कफ निघण्यास मदत होते. याने म्युकस ब्रेकडाउन करण्याचं काम होतं. तुम्हाला हवं तर तुम्ही पेपरमिंटचा वापर तुम्ही चहासाठीही करू शकता किंवा वेपर स्टीम बाथच्या रूपातही करू शकता.

हळदीचा वापर - हळदीमध्ये कर्क्यूमिन तत्व असतं. तसेच यात अँटी-इंफ्लोमेटरी तत्वही असता. कोरडा खोकला दूर करण्यासाठी हळद फायदेशीर ठरते. आयुवेर्दातही हळदीचं महत्व सांगितलं आहे. हळदीसोबत काळे मिरे सेवन केले तर कफची समस्या दूर होते. चहातही याचा वापर करू शकता.

ओव्याचा वापर - कफ काढण्यासाठी ओव्याच्या पानांचा वापरही फायदेशीर ठरतो. यात थाइम हे तत्व असतं. एका रिसर्चमधून समोर आले आहे की, ओव्याच्या पानांचा रस सेवन केल्यास कफ दूर होतो आणि घशाला आराम मिळतो. ओव्याच्या पानांमध्ये फ्लेवोनोइड्स नावाचं तत्व असतं ज्याने घशाच्या मांसपेशींना आराम मिळतो. तसेच खोकलून खोकलून आलेली सूजही कमी होते, खोकला किंवा कफची समस्या काही लोकांना एका विशिष्ट्य वातावरणातच होते. अशात त्या त्या वेळी योग्य ती काळजी घेतली गेली तर ही समस्या होणार नाही. जास्तीत जास्त लोकांना ऑक्टोबरमध्ये कफची समस्या होते. त्यामुळे त्यादरम्यान विशेष काळजी घ्यावी.

## बोधकथा

## विचित्र परीक्षा

त्या दिवशी बऱ्याच दिवसानंतर अकबराला आपल्या दरबाऱ्यांची विचित्र परीक्षा घेण्याची लहर आली. अकबराने आपल्या सरदारांना मांजरीची गोजिरवाणी पिल्ल दिली. ते म्हणाले आज पासून बरोबर सहा महिन्यांनी हि पिल्ल घेऊन दरबारात यायच आहे. ज्याचे मांजर श्रेष्ठ ठरेल त्याला बादशाह कडून मोठ बक्षीस दिल जाईल. प्रत्येक सरदार आपलयाला मिळालेल्या मांजराचे पिल्लू घेऊन घरी गेले. घरातल्या माणसांना त्यांनी बादशाहाने ठेवलेल्या बक्षीसाबद्दल सांगितले. मांजराला चांगली मिठाई व दुध खाऊ पिऊ घाला, अशी सरदाराने घरातल्या माणसांना सूचनाच दिली. प्रत्येक सरदाराच्या घरी मांजरांचा खुराक चालू झाला. हळू हळू मांजरांच्या अंगावर तेज येऊ लागल. ती चांगली गुबगुबीत दिसू लागली. मात्र आपल्या बिरबलाने आपल्याला मिळालेल्या मांजराला असा खुराक दिला नाही. घरातल्या साध्या अन्नावर त्याला वाढववील. उंदीर पकडायला शिकवलं. बिरबलाचे मांजर उंदीर पकडण्यात तरबेज झाले. मात्र ते हडकुळे राहिले. अकबर बादशहाने एक चांगला दिवस ठरवून सर्व सरदारांना आप-आपली मांजर दरबारात आणायला सांगितली. प्रत्येक जण आपआपली मांजर घेऊन दरबारात पोहचले. अकबराने सर्व मांजरा वरून नजर फिरवली. बिरबलाच्या हातातील हडकुळे मांजर पाहून बादशाहाला हसू आले. आपले हसू दाबीत बादशहा म्हणाला "बिरबल सर्व सरदारांची मांजर बघ कशी गुबगुबीत दिसत आहे आणि तुझे मांजर का असेल हडकुळे?". बिरबल आपल्या मांजरी वरून हात फिरवत म्हणाला, "खाविंद आपण मांजराची परीक्षा तर घ्या." उंदीर पकडणे हे मांजराचे महत्वाचे काम आहे. त्यात ते पटाईत असायला हवे. अकबराने मान हलवली आणि नोकराला दरबारात उंदीर सोडायला सांगितले. पंधरा वीस उंदीर दरबारात धाऊ लागले. प्रत्येक सरदाराने त्या दिशेने आपली मांजर सोडली. बिरबलाच्या मांजराने तर बिरबलाच्या हातातून उडी मारली. ते उंदराच्या मागे सुसाट धावत सुटले. त्याने दोन तीन उंदीर मारले देखील. इतर गलेलठ्ठ मांजरे फक्त आपल्या गोंडेदार शेपट्या फुगवून तशाच जागेवर बसून पाहून लागली. त्यांनी फक्त आपल्या मिशा फेंदारल्या होत्या आणि अंग फुगविले होते. सरदार त्यांना पुढे ढकलत होते. परंतु जागेवरून हलण्याची त्यांची तयारी नव्हती. बादशहाने बिरबलच्या मांजराला श्रेष्ठ ठरवून बिरबलाला भल मोठ बक्षीस दिल.



# संपादकीय...

## उद्ध्वस्त आखाडा!



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

आधीच महिलांची सुरक्षितता, हितरक्षण याबाबत एकीकडे संस्थात्मक यंत्रणा भक्कम करणे आणि दुसरीकडे त्यांच्या प्रश्नांच्या बाबतीत सर्व पातळ्यांवर संवेदनशीलता बाळगणे याची गरज आहे. डाव-प्रतिडाव, शह-काटशह अशा प्रकारे भारतीय कुस्तीच्या आखाड्यात गेली सुमारे वर्षभर धुराळा उडत आहे. अर्धा डझनवर महिला कुस्तीपटूंनी तत्कालीन अध्यक्ष आणि भारतीय जनता पक्षाचे खासदार ब्रजभूषण शरण सिंह याच्यावर लैंगिक छळाचा आरोप केला. त्याच्यावर कारवाई करावी, गुन्हे दाखल करावेत, शिक्षा करावी, या मागण्यांसाठी आंदोलनाचे हत्यार उपसले होते. त्याच धुराळ्यात भारतीय कुस्ती महासंघाची निवडणूक जाहीर झाली. एप्रिल-मेमध्ये सुरू झालेल्या या प्रक्रियेला न्यायालयीन लढाईचे अडथळे पार करावे लागले. याच ब्रजभूषण शरण सिंह यांच्या पुढाकाराने रिंगणात उतरलेल्या पॅनलने गुरुवारी (ता.२१) दणदणीत विजय मिळवत पंधरापैकी तेरा जागा पटकावल्या. त्याचे खंदे समर्थक आणि मुलापेक्षा अधिक जवळचे असल्याचे मानले जात असलेले संजयसिंह अध्यक्षपदी निवडून आले. तथापि, आपल्यावरील लैंगिक छळाबद्दल न्यायाची याचना मागणाऱ्या कुस्तीपटूंच्या आशेचा चुराडा झाल्याची भावना व्यक्त करत साक्षी मलिकने कुस्तीच्या आखाड्याला कायमचा रामराम ठोकण्याचा निर्णय साश्रू नयनांनी जाहीर केला. देशाला ऑलिंपिकसह राष्ट्रकुल, आशियाई स्पर्धांमध्ये याच साक्षीने पदके कमवून दिली होती. तिच्या जोडीला विनेश फोगट, बजरंग पुनिया हेही चाळीस दिवस रस्त्यावर उतरून अन्यायाला वाचा फोडत होते.

पोलिसांचे दंडुके सोसत होते. तथापि, केंद्रातील सत्ताधाऱ्यांनी ब्रजभूषणसिंहवर कारवाईचा दंडुका उगारणे सातत्याने टाळले, परिणामी त्याची दर्पोक्ती वाढत होती. तो अद्वातद्वा विधाने करत होता. त्याचाच गट विजयी झाल्याने त्याचे बाहू आणखीनच फुरफुरू लागले असले तर आश्चर्य नाही. पण या विजयोन्मादात साक्षी मलिकच्या वेदनेकडे दुर्लक्ष होता कामा नये. समाजात कुस्तीपटूंच्या आंदोलनानंतर विसर्जित केलेल्या भारतीय कुस्ती महासंघाची निवडणूक मेमध्ये होणार होती. क्रीडामंत्र्यांनी ही प्रक्रिया रोखत भारतीय ऑलिंपिक महासंघाला स्वतंत्र यंत्रणेमार्फत ४५ दिवसांत निवडणूक घेण्याचे आदेश दिले होते. याच काळात महिला कुस्तीपटूंच्या आंदोलनाची धार तीव्र झाली. क्रीडापटू मेरी कोम यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल जाहीर केला नाही; उलट ब्रजभूषणसिंहची मग्रुरी वाढतच राहिली.

आंदोलनावर तोडग्याऐवजी प्रश्न चिघळतच गेला. त्यात आंदोलकांवर पोलिसांनी लाठीमार केल्याने आगीत तेल ओतले गेले. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समिती तसेच जागतिक कुस्ती संघटनेने निषेध केला होता. या सगळ्या घटना घडत असताना जुलैमध्ये होणारी निवडणूक पहिल्यांदा गुवाहाटी उच्च न्यायालयाच्या तर त्यानंतर पुन्हा ऑगस्टमध्ये होऊ घातलेली निवडणूक पंजाब-हरयाणा उच्च न्यायालयाच्या आदेशाने रखडत गेली. परिणामी, जागतिक कुस्ती संघटनेने भारतीय कुस्ती महासंघाचे सदस्यत्वच रद्द केले. ही एका अर्थाने नामुष्कीच आपण आपल्या कर्तृत्वाने आणि निषेधार्ह अशा घटनांनी ओढवून घेतली होती. तथापि, त्याचे सोयरसुतक सत्ताधाऱ्यांना व क्रीडा संघटक म्हणून मिरवणाऱ्यांना वाटले नाही. निवडणुकीत ब्रजभूषणसिंह यांचे समर्थक जयप्रकाश, असीतकुमार साहा, कर्तारसिंह, एन. फोनी निवडून आले.

संजयसिंह यांनी राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या अनिता शेरान यांचा पराभव केला. याच कुस्तीपटूंचे पाठबळ असलेले प्रेमचंद लोचाब सरचिटणीस या महत्त्वाच्या पदावर निवडले असले तरी ते अल्पमतात आहेत. संघटनेच्या निवडणुकीत महिलांना स्थान असावे, अशी आंदोलकांची मागणी होती, ती निकालाने फोल ठरवली आहे. आंदोलक म्हणून रस्त्यावर उतरलेल्या प्रत्येक कुस्तीपटूने आपल्या कामगिरीने देशाची मान उंचावली आहे. त्यांनी लैंगिक छळाच्या प्रश्नावर दाद मागूनही त्याबाबत काहीच घडले नाही. आता तर निराश होऊन कुस्तीला रामराम ठोकण्याची वेळ साक्षीवर आली आहे.

खरे तर साक्षीची लढाई , तिची व्यथा ही कोणत्याही क्षेत्रात पुढे येऊ पाहणाऱ्या प्रत्येक महिलेची व्यथा आहे. मनोधैर्य वाढवणारी व्यवस्था नसेल, तर तिने माघार घ्यायची, हे निकोप समाजाचे लक्षण नाही. लिंगभावाधारित समतेपासून आपण अद्यापही दूर आहोत, याची जाणीव या घटनांमुळे होते. मुलींना मोकळेपणाने मैदानात मर्दुमकी गाजवता यावी, यासाठी महत्प्रयास झाले. ती प्रक्रिया पुन्हा मागे जाता कामा नये. साक्षीची निवृत्ती हा विषय म्हणूनच गांभीयार्ने विचारात घ्यावा लागेल. महिला कुस्तीपटूंनी लैंगिक छळाचा आरोप करत आंदोलनाचा मार्ग अवलंबला, त्यावेळी क्रीडा क्षेत्रातील महिलांचे प्रश्न, त्यांच्या समस्यांची तड लावण्यासाठीची व्यवस्थात्मक रचना आणि त्यावर महिलांचे प्रतिनिधित्व; तसेच त्याबाबतच्या समित्यांचे कामकाज व नियुक्ती याचा मागोवा घेतला गेला. त्यावेळी सगळे काही कागदावर आलबेल; पण वास्तव त्याहून भीषण असल्याचे निदर्शनाला आले होते. महिलांची सुरक्षितता, हितरक्षण याबाबत एकीकडे संस्थात्मक यंत्रणा भक्कम करणे आणि दुसरीकडे त्यांच्या प्रश्नांच्या बाबतीत सर्व पातळ्यांवर संवेदनशीलता बाळगणे याची गरज आहे.

या दोन्हीची उणीव या सगळ्या प्रकरणात आढळली, त्यामुळे साक्षीला 'आखाड्या'तून माघार घ्यावी लागली. ही घटना विविध क्षेत्रात उतरू पाहणाऱ्या महिलांच्या इच्छाशक्तीला खो घालणारी ठरू शकते.व्यवस्था सक्षम हवीच; पण केवळ कायद्याने भागत नाही तर पुरुषवर्चस्ववादी मानसिकतेतून समाजाला बाहेर काढण्यासाठी प्रबोधनाचे अस्त्रही वापरले पाहिजे.

# धारेवर धारावी!



धारावीचा विकास हा एखाद्या इमारत पुनर्विकासासारखा नाही, त्याचा अनेक अंगाने विचार करावा लागणार आहे. मुंबई नव्हे; तर आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी अशा लौकिकाने गाजलेली धारावी सध्या पुनर्विकासाच्या मुद्द्यावरून चांगलीच चर्चेत आहे. शिवसेनेच्या एका गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी धारावीकरांच्या अधिकारांसाठी मोर्चा काढून या प्रश्नाला आणखी धार लावली आहे.

राजकारणाच्या संघर्षात अडकलेल्या प्रश्नांचे अनेकदा इतके सुलभीकरण केले जाते, की जणू काही अमूक व्यक्ती वा पक्ष सत्तेवरून जाऊन तमूक व्यक्ती वा पक्ष आली की प्रश्न सुटेल. प्रत्यक्षात तसे होत नसते, याचे धारावी हे उत्कृष्ट उदाहरण. पासष्ट गिरण्या असलेल्या मुंबापुरीची 'गिरणगाव' ही ओळख कामगारांच्या प्रदीर्घ संपानंतर गमावली गेली.

आता काही पडीक चिमण्या आणि मिलच्या जमिनीवर उभ्या राहिलेल्या मॉलमध्ये काम करणारी गिरणी कामगारांची मुले एवढीच ओळख सध्या उरली आहे. नाही म्हणायला गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न अजून प्रलंबित असल्याने तो अधूनमधून उचल खातो. गिरण्यांची सद्दी संपल्यानंतर मुंबईच्या मोकळ्या जागांवर उंचच उंच इमारती उभ्या राहिल्या आणि मुंबईदेखील उंचावरून दुबई, सिंगापूरसारखी भासू लागली. पण तिच्या या सौंदर्यात 'धारावी' मात्र खटकत होती. मुंबईसारख्या जगभरात महागड्या शहरामध्ये मध्यवर्ती जागेवर धारावी असल्याने तिच्याकडे अनेकांचे लक्ष होतेच. एवढ्या मोठ्या परिसराचा विकास हा काही लगेच होणार नाही हेही खरेच. पण हा विकास साधायचा कसा आणि कुणाचा विकास होणार असे अनेक प्रश्न होते.

धारावीच्या रूपाने अनेक मुद्दे पुढे येतात. त्यामुळेच गेली सुमारे १५-२० वर्षे त्याच्या चर्चाच सुरू आहेत. अनेक अभ्यास झाले, अनेक चर्चा झाल्या, पण विकास कसा आणि कधी होणार हे प्रश्न बराच काळ प्रलंबित राहिले होते. मुळात धारावी हा काही गृहप्रकल्प नाही. त्याच्याकडे या एकाच नजरेतून पाहिले जाते आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. धारावीचा इतिहास पाहिला तर १८५० नंतर ब्रिटिश राजवट सुरू झाल्यानंतर तिचा प्रामुख्याने विकास झाला. तिथे अनेक उद्योग सुरू झाले. जसे उद्योग सुरू झाले, तशी लोकवस्ती वाढत गेली आणि याचा वेग एवढा प्रचंड होता, की स्वातंत्र्यानंतरच्या काही काळात ती सर्वाधिक मोठी झोपडपट्टी गणली गेली. देशातील सर्वात मोठा चामड्याचा उद्योग तिथे आहे. शिवाय फरसाण, मातीची भांडी, गार्मेंट असे एक ना अनेक उद्योग तिथे आहेत. 'स्लमडॉग मिलेनियर', 'गली बॉय'सारख्या चित्रपटांतून तिथली लहान घरे, छोट्या गल्ल्या, असुविधा दिसल्या असल्या, तरी प्रत्यक्षात अनेक मोठ्या उद्योगांचे ते केंद्र आहे.

तिथे घरटी काही तरी उद्योग सुरू असतो. त्यामुळे धारावीचा विकास हा एखाद्या इमारत पुनर्विकासासारखा नाही, त्याचा अनेक अंगाने विचार करावा लागणार आहे. टाटा सामाजिक संस्थेतील तज्ज्ञांनी याचा अभ्यास केला होता. त्यांच्या मते हा केवळ भौतिक विकास नाही, तो सामाजिक विकास आहे. तिथल्या व्यवसायांचा विचार प्रामुख्याने करावा लागणार आहे. सद्यःस्थितीत एक लाख निवासी घरांबरोबरच तिथे ४० हजार छोटे-मोठे व्यवसाय आणि त्यावर अवलंबून असलेली रोजीरोटी आहे. त्यामुळे हा केवळ मानव पुनर्विकास नाही, त्याकडे त्या नजरेतून पाहता कामा नये. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सर्वप्रथम धारावीच्या पुनर्विकासाचा प्रश्न समोर आणला होता. त्यासाठी १९९७ पासून जागतिक निविदा काढण्यात आल्या आहेत. २००४ मध्ये सिंगापूर, दुबई, अमेरिकेतील कंपन्यांनी रस दाखवला होता; मात्र या प्रकल्पाची रखडपट्टी सुरू झाली. आपल्याकडे कोणताही प्रकल्प सुरू झाला की पात्रता-अपात्रतेचा वाद सुरू होतो. त्यातच अनेकदा प्रकल्पविलंब सुरू होतात आणि त्यांची किंमत अव्वाच्या सव्वा होते. मग ते किफायशीर ठरण्याऐवजी पांढरा हत्ती ठरतात. अशाच अपात्रतेत काही काळ धारावी प्रकल्पाने गटांगळ्या खाल्ल्या आहेत. चीनमध्ये पुनर्विकास करताना जागा निश्चित करून पूर्ण वस्ती किंवा परिसर स्थलांतरित केला जातो. यात तिथे आहेत त्या सर्वांचे लागलीच पुनर्वसन होते आणि निर्णय तातडीने होत असल्याने वादाचे प्रसंग खूप कमी निर्माण होतात आणि प्रकल्प वेळेत पूर्ण होतात. धारावीच्या बाबतीत मात्र अनेक वर्षे असे विषय निघत आहेत आणि लोकांचा सरकारवर विश्वास बसत नाही. मग 'धारावी बचाव'चे नारे सुरू होतात आणि मोर्चेही निघतात. आताही सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी सुरू आहे.

'सेकलिंक' नावाच्या कंपनीची निविदा मंजूर झालेली असतानाही ती सरकारने रद्द का केली, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे. त्यानंतर या प्रकल्पात अदानी समूहाचा प्रवेश झाला. यामुळेच धारावीकरांच्या भुवया उंचावल्या आहेत. 'सेकलिंक'ने न्यायालयात दाद मागितली आहे. सरकारनेही अदानींवर सवलतींची खैरात केल्याचा विरोधकांचा आरोप आहे. यापैकी सर्वात मोठा आक्षेप हा 'टीडीआर'चा आहे. धारावीसारख्या मोठ्या भूखंडातून निर्माण होणारा सर्व 'टीडीआर' पूर्ण मुंबईभर वापरण्यात येणार आहे आणि इतर विकसकांना अदानींकडून विकत घ्यावा लागणार आहे. मुंबईचा असा सर्वात मोठा भूभाग एका कंपनीच्या हाती गेल्याने धारावीचे काय होणार, असा गंभीर प्रश्न आहे. धारावी झोपडपट्टी म्हणून प्रसिद्ध असली, तरी तिच्याकडे एका व्यावसायिक संकुलासारखे पाहायला हवे. त्यातील उद्योग टिकले तर रोजगार टिकेल आणि रोजगार टिकले तर माणसे टिकतील. अशाच मानवकेंद्रित विकासाची अपेक्षा ह्यधारावीह्नला आहे.

# भारत आणि पश्चिम आशिया



'एनसीआरबी'च्या पश्चिम आशियातील देशांशी संबंध चांगले ठेवण्याचे मोठे आव्हान भारतापुढे आहे. या भागातील अनेक देशांशी वर्तमानात ताणतणाव उत्पन्न झाले आहेत. ओमानचे सुलतान नुकतेच भारतात येऊन गेले. त्यांच्याशी झालेल्या चर्चेर्लाही हा संदर्भ होता. या पार्श्वभूमीवर या प्रश्नाचे स्वरूप आणि भारत सरकार करीत असलेले प्रयत्न यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न.

भारत आणि पश्चिम आशियात समाविष्ट होणारे अनेक देश यांच्यात वर्तमानात ताणतणाव उत्पन्न झाले आहेत. मुळात पश्चिम आशिया याचा अर्थ एका बाजूने अफगाणिस्तान, तर दुसऱ्या बाजूने सीरिया किंवा एका बाजूने पर्शियन आखात, तर दुसऱ्या बाजूने भूमध्यमहासागर या टोकांमध्ये वसलेला भूभाग. इथे एकूण वीस देशांची गणना केली जाते.

या देशांमध्ये बहुसंख्य इस्लामपंथीय आहेत. अर्थात आर्मेनिया, इस्त्राईल हे देश इस्लामेतर पंथांचे आहेत आणि खुद्द मुस्लिमांमध्ये शिया, सुन्नी वगैरे उपपंथही आपापली चूल मांडून मोकळे झाले आहेत व म्हणून तर भले धर्म एक असेल; पण राष्ट्रे अनेक आहेत. सन १९९१पूर्वी म्हणजे सोव्हिएट संघ कोसळण्यापूर्वी अमेरिकेला एक प्रतिस्पर्धी होता व म्हणूनच अमेरिकेने अवघ्या पश्चिम आशियात स्वतःचे वर्चस्व उत्पन्न केले होते. शीतयुद्धातली प्यादी या दृष्टीनेच या भूभागातल्या देशांचा तेव्हा विचार झाला. भारत तेव्हा तटस्थ होता; पण सोव्हिएत संघाशी आपले जिव्हाळ्याचे संबंध होते, तर अमेरिकेने पाकिस्तानशी जवळीक केली होती. पश्चिम आशियातले मुस्लिम देश पाकिस्तानच्या नादी लागून भारताच्या विरोधात जाऊ नयेत या दृष्टिकोनातून मग आपणही या मुस्लिम देशांच्या भावभावनांची जपणूक केली. किंबहुना याच जपणुकीचा एक पैलू म्हणून इस्त्राईलशी काहीसा दुरावा ठेवला. शीतयुद्ध संपल्यावर जगाचा सारीपाट बदलला. आपल्याही लक्षात आले की इस्त्राईलशी दुरावा ठेवणे भारताच्या हितसंबंधांच्या दृष्टीने गैर ठरेल. तेव्हापासून इस्त्राईल-भारत यांच्यातली जवळीक वाढली. कारगिल युद्धात व नंतरही इस्राईलने दिल्लीशी मैत्री वाढवली. उलटपक्षी काश्मीरचा विषय असेल अथवा भारतीय मुसलमानांचा विषय असेल; त्या बाबतीत पश्चिम आशियाई इस्लामिक देश अकारण भारताविषयी गैरसमज बाळगतात, हे आपल्या ध्यानात आले.

भारताच्या परराष्ट्र धोरणात २०१४ पासून महत्त्वाचे बदल झाले. भारतीय राज्यकर्त्यांच्या लक्षात आले की सन १९४८ मधे इस्त्राईलची निर्मिती झाली आणि त्यानंतरच्या साडेसहा दशकात कैक मुस्लिम राष्ट्रांनी इस्त्राईलशी शांतता व मैत्रीचे करार केले आहेत. इजिप्त, सुदान, संयुक्त अरब आमिराती, बहारिन, जॉर्डन तसेच मोरोक्को या देशांचा इथे उल्लेख करता येईल.

याचा अर्थ मुस्लिम देशांवर पंथवादापेक्षा राष्ट्रवादाचा प्रभाव आहे, हे जगालाच कळून चुकले. वर उल्लेखिलेल्या देशांच्या यादीतले इजिप्त, मोरोक्को, सुदान पश्चिम आशियात गणले जात नाहीत; पण इस्लाम या देशांना एकत्र आणू शकत नाही, हे नक्कीच दिसून येते. दुसरे म्हणजे सन २०१४ नंतर भारत सरकारने ३७० कलम हटविले, राममंदिराचा प्रश्न सोडविला आणि तरीही पश्चिम आशियाई मुस्लिम राष्ट्रांमधे कुठलीही अस्वस्थता नाही, हे लक्षात आले. महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुस्लिम देशांचे (सुन्नी मुस्लिमांचे) नेतृत्व करणाऱ्या सौदी अरेबियातच मवाळ विचारांचे, कालबाह्य रुढींच्या निर्मूलनाचे वारे वाहू लागले. संयुक्त अरब आमिरातीने तर हिंदू मंदिराच्या उभारणीस सहर्ष अनुमती दिली. तरीही भारत व पश्चिम आशियातले काही मुस्लिम देश यांच्यात ताणतणाव उत्पन्न झाले याची नोंद घेतली पाहिजे. असे ताणतणाव उत्पन्न होऊ नयेत व उत्पन्न झालेच तर ते अल्पावधीत मिटावेत यासाठी थेट अटलबिहारी वाजपेयी, डॉ. मनमोहन सिंग व नरेंद्र मोदी या भारतीय पंतप्रधानांनी विशेष प्रयत्न केले, हेही विसरुन चालणार नाही. पाकिस्तानी नेत्यांनी मात्र केवळ इस्लामच्या धाग्यांवर विसंबून पारंपारिक वाटचाल चालू ठेवली.


जोडीला भारतात दहशतवाद पसरविण्यात पुढाकार घेतला. आश्चर्य व आनंद म्हणजे सौदी अरेबियाने पाकिस्तानची पर्वा न करता सन २००८ मधे मुंबईवर हल्ले करणाऱ्या अबूजिंदाल व फसी मोहम्मद या दहशतवाद्यांना अटकेत टाकले. काश्मीर प्रश्नावरही पाकिस्तानची बाजू घेण्यास सौदी सरकारने नकार दिला. सौदी राज्यकर्त्यांना कळून चुकले आहे की, पाकिस्तान शियापंथीय इराणला जिवलग मित्र मानतो. 'इस्लामिक स्टेट'सारख्या दहशतवादी संस्थांचे भरणपोषण करतो. उलटपक्षी भारताला सौदी अरेबियाच्या खनिज तेलाची गरज आहे. सहस्त्रो-लाखो भारतीय कर्मचारी मुस्लिम देशांमधून विकासप्रक्रियांना गती देत आहेत. दुर्दैव म्हणजे भाजपच्या तत्कालीन प्रवक्त्या नुपूर शर्मा यांनी प्रेषित मोहम्मद पैगंबरांविषयी काही विधाने केली व परिणामतः केवळ सौदी अरेबियातच नव्हे तर सोळा मुस्लिम देशांमध्ये भारताविषयी नाराजी निर्माण झाली. सन २०१९ मधे भारताचे परराष्ट्रमंत्री म्हणून नियुक्त झालेल्या एस.जयशंकर यांनी मग सन २०२२च्या सप्टेंबरात सौदी अरेबियाचा प्रवास केला. भाजपाने नुपूर शर्मांना प्रवक्तेपदावरुन खाली उतरविले. जयशंकर यांनी सौदी-परराष्ट्रमंत्र्यांच्या सहकार्याने 'भारत-सौदी सामरिक सहभगिता मंडळा'च्या कार्याचे पुनरुज्जीवन केले.

सौदी अरेबियात जवळजवळ ३५ लाख भारतीय मौलिक योगदान देत आहेत व भारताची बाजारपेठ सौदी अरेबिया तसेच अन्य मुस्लिम देशांच्या खनिज तेलाची लक्षणीय आयात करीत आहे. हेही या देशांनी ओळखले व ताणतणाव मिटविण्यास संमती दिली. नजीकच्या भूतकाळात कतार देशाच्या कनिष्ठ न्यायालयाने आठ भारतीय नागरिकांना फाशीची शिक्षा ठोठावली आहे आणि यामुळेही भारत आणि कतार या देशांमधे वितुष्ट उद्भवणार की काय, हे भय निर्माण झाले आहे. कतार देशानेच एका बाजूने हमास व तालिबान या दहशतवादी संघटनांना पाठिंबा दिला आहे, तर अमेरिकेशी मैत्री जपण्यासाठी या संघटनांवर काही अंकुशही ठेवला आहे. भारत कतारमधूनच प्रवाही नैसर्गिक वायूची प्रचंड आयात करतो. तेव्हा कतारच्या शासकांनीच आठ भारतीयांना क्षमा करावी आणि हमास व इस्त्रायल यांच्यातला संघर्ष मिटवण्यात पुढाकार घ्यावा, या उद्देशाने थेट नरेंद्र मोदींनीच कतारच्या मुख्य अमीरांशी दुबईत चर्चा केली.

हमासने इस्त्राईलवर दहशतवादी हल्ला केला, तेव्हा भारताने हमासच्या विरोधात व इस्त्राईलच्या बाजूने आवाज उठविला. अर्थात पश्चिम आशियातल्या मुस्लिम राष्ट्रांनी आपांपसातले मतभेद बाजूला ठेवून इस्त्राईलविरोधी पवित्रा धारण केला. मग भारताने सत्वर आपली भूमिका स्पष्ट केली. ह्यआम्ही हमासला विरोध करतो; पण पॅलेस्टाईनचे सार्वभौमत्व इस्त्राईलने जपलेच पाहिजे, तसेच हमासशीही संघर्ष थांबविला पाहिजे,' अशी संतुलित भूमिका या सर्व मुस्लिम देशांच्या गळ्यात उतरविण्याचे प्रयास भारताने युद्धपातळीवर चालविले आहेत. इस्त्राईलला प्रखर विरोध करणाऱ्या इराणचीही समजूत काढण्यासाठी थेट नरेंद्र मोदींनीच पुढाकार घेतला आहे. इराणच्या अध्यक्षांना मोदींनी दिल्लीहून दूरध्वनी केला व अवघ्या पश्चिम आशियात शांतता नांदावी म्हणून तेहेरानला सर्वतोपरी सहकार्य करण्यास भारत सिद्ध आहे, अशी माहितीही मोदींनी दिली. एवढेच नव्हे तर इराणचे चाबहार बंदर विकसित करण्यात व आंतरराष्ट्रीय उत्तर- दक्षिण मार्गिका व्यवहारात उतरविण्यातही भारत कमालीचा उत्सुक आहे, या माहितीला तेहरानकडून दुजोरा मिळविण्यात मोदी यशस्वी झाले आहेत. या पृष्ठभूमीवर आपले परराष्ट्रसचिव विनय क्वात्रा तेहेरान भेटीवर गेले व तिथल्या उच्चपदस्थांशी सुसंवाद साधून भारतात परतले. खेदाची गोष्ट म्हणजे अफगाण भूमीवर आज तालिबान सत्ताधीश आहे व या तालिबानी शासकांनी चीनशी गोत्र जुळवले. चीनच्या तथाकथित रेशीम मार्गाच्या व्यूहरचनेत सहभागी होण्यास होकार दिला तर भारतासाठी ती अशुभाची निशाणी ठरेल. अर्थात चीननेही जगातल्या कैक देशांप्रमाणेच तालिबानी शासनास मान्यता दिलेली नाही; पण भारताची कोंडी करण्यासाठी चीन काहीही करु शकतो हे भूतानच्या उदाहरणावरुन स्पष्ट झाले आहे.

भूतानच काय, भारताच्या शेजारी राष्ट्रांपैकी कोणत्याही राष्ट्राला चीन मैत्रीपाशात आकृष्ट करील. आज तरी अफगाण शासक भारताशी वैर करण्यास तयार नाहीत, कारण पाकिस्तान या शासकांना पुरेसा छळत आहे. ओमानचे सुलतान सोळा डिसेंबरला भारत भेटीवर आले होते. त्यांच्याशीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विस्ताराने चर्चा केली. संपूर्ण पश्चिम आशिया व दक्षिण आशिया येथे आपले मैत्रीपूर्ण संबंध असावेत, याची आवश्यकता सरकारला कळली आहे व त्यादृष्टीने जारीने प्रयत्न सुरू आहेत, असे नक्कीच म्हणता येते.

# करोना रुग्णांमुळे ठाणे पुन्हा सतर्क; गेल्या २० दिवसांत नऊ रुग्ण आढळले, करोना चाचण्या वाढविण्याबरोबरच संसर्ग रोखण्यासाठी उपाययोजना



**ठाणे। प्रतिनिधी,**

भारतामध्ये 'जेएन १'या ओमायक्रॉनच्या नव्या उपप्रकाराचा विषाणूची लागण झालेले रुग्ण आढळून येत असतानाच, ठाणे शहरात गेल्या २० दिवसांत नऊ करोनाबाधित रुग्ण आढळून आल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. या रुग्णांच्या नमुने तपासणीचे अहवाल अद्याप पालिकेला प्राप्त झालेले नसल्यामुळे त्यांना नव्या उपप्रकाराची लागण झाले आहे की नाही, हे समजू शकलेले नाही. शहरात करोनाचे रुग्ण आढळून आल्याने पालिका आरोग्य विभागाने योग्य ती काळजी घेण्याबरोबरच करोना चाचण्या वाढविण्याची तयारी सुरू केली आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात गेल्या दोन वर्षांपासून करोनाचा संसर्ग आटोक्यात आहे. यंदाच्या मार्च महिन्यात आणि त्यानंतर ऑगस्ट महिन्यात करोनाचे रुग्ण आढळून आले होते. ऑगस्ट महिन्यानंतर मात्र करोना संसर्ग आटोक्यात आला होता. गेल्या काही महिन्यांपासून शहरात करोनाचा रुग्ण आढळून येत नसल्याने पालिका प्रशासनाने सुटकेचा निःश्वास टाकला होता. परंतु डिसेंबर महिन्यात करोना आजाराने पुन्हा डोके वर काढले आहे. गेल्या २० दिवसांत शहरात ९ करोना बाधित रुग्ण आढळून आलेले आहेत. त्यापैकी केवळ एका रुग्णांची प्रकृती चिताजनक असून तिला कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील विशेष कक्षात उपचारासाठी दाखल करण्यात आलेले आहे. उर्वरित रुग्णांची गृह विलगीकरणात राहून उपचार घेतले आहेत. शहरात करोनाचे रुग्ण आढळून आल्याने पालिका आरोग्य यंत्रणा सर्तक झाली आहे. शासनाच्या निदेर्शानुसार शहरातील आरोग्य केंद्र आणि कळवा रुग्णालयात संशयित रुग्णांची करोना चाचणी करण्यात येते. दिवसाला २०० चाचण्या करण्यात येत असून त्यात १२० शीघ्र प्रतिजन तर ८ आरटीपीसीआर चाचण्या करण्यात येतात. परंतु करोनाची लक्षणे असणाऱ्यांची आरटीपीसीआर चाचणी करण्याचे शासनाने निर्देश दिले आहेत.

त्यामुळे आरटीपीसीआर चाचण्या वाढविण्याची तयारी पालिका प्रशासनाने सुरू केली आहे. तसेच करोनाबाधित रुग्ण उपचारासाठी कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात विशेष कक्ष उभारण्यात आलेला आहे. त्याठिकाणी उपचारासाठी एकूण २० खाटा आहेत. त्यातील पाच खाटा अतिदक्षता विभागातील आहेत, अशी माहिती पालिका सुत्रांनी दिली. शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार दर महिन्याला सुमारे २५ रुग्णांचे नमुने पुणे येथील एनआयव्ही येथे तपासणीसाठी पाठविण्यात येतात. डिसेंबर महिन्यात एकूण ९ रुग्ण आढळून आलेले असून त्यापैकी ७ रुग्णांचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आलेले आहेत. त्याचे अहवाल अद्याप प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे त्यांना नव्या उपप्रकाराची लागण झाले आहे की नाही, हे समजू शकलेले नाही, अशी माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

# मुंढवा भागात अल्पवयीन कर्णबधिर मुलीवर अत्याचार; मित्र, नातेवाईकासह तिघांवर गुन्हा दाखल




**पुणे। प्रतिनिधी,**

अल्पवयीन कर्णबधिर मुलीवर तिच्याच मित्र तसेच नातेवाईक आणि एका ओळखीतील तरुणाने वारंवार बलात्कार केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. कर्णबधिर शाळेतील शिक्षिकेने विचारणा केल्यानंतर त्यांच्यासमोर मुलीने ही कैफियत मांडली आणि हा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी मुंढवा पोलीस ठाण्यात सागर रजाने (वय ३०, रा. उंड्री, कोंढवा), राहुल पाटील (वय २३) यांच्यासह तिच्या एका नात्यातील अल्पवयीन मुलावर बलात्कार, पॉक्सो, विनयभंग यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी एका कर्णबधिर शाळेच्या शिक्षिकेने तक्रार दिली आहे. हा प्रकार २०१८ पासून २०२३ पर्यंत सुरू होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी १७ वर्षांची आहे. गेल्या पाच वर्षांपासून हा प्रकार सुरू आहे. ती कर्णबधिर आहे. राहुल पाटील हा तिचा मित्र आहे. तर, अल्पवयीन मुलगा तिच्या जवळच्या नात्यातील आहे. सागरने तिच्या घरी येऊन जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. तिला मारहाण केली आणि कोणाला काही सांगितले तर मारून टाकण्याची धमकी दिली. तसेच, राहुलने तिच्याशी लग्न करण्याचे आमिष दाखवत तिच्यावर बलात्कार केला. तर तिच्या नात्यातील १४ वर्षीय मुलाने घरात कोणी नसल्याचा फायदा घेत जबरदस्तीने अत्याचार केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. ही पीडित मुलगी आणि तिचा मित्र बोलत असताना तिला शिक्षकांनी पाहिले. तिच्याकडे विचारणा केली असता हा सर्व प्रकार समोर आला आहे.

# "सरकारने सोलार इंडस्ट्रीज स्फोटप्रकरणी चर्चा टाळली", बाळासाहेब थोरात यांचा आरोप



**नागपूर। प्रतिनिधी,**

बाजारगाव येथील सोलार इंडस्ट्रीज या स्फोटके निर्मिती कारखान्यात भीषण स्फोट होऊन नऊ कामगारांचा मृत्यू झाला. मात्र, नागपुरातील विधिमंडळ अधिवेशनात यावर सविस्तर चर्चा टाळून सरकारने पळ काढला, असा आरोप काँग्रेसचे विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी केली. विधानसभेतील सर्वात वरिष्ठ सदस्य असलेले बाळासाहेब थोरात यांनी लोकसत्ता कार्यालयाला बुधवारी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी सरकारच्या कामकाज चालवण्याच्या पद्धतीवर नापसंती व्यक्त केली. ते म्हणाले, रविवारी सकाळी ही घटना घडली. त्यामुळे दुसऱ्या दिवशी सोमवारी या घटनेवर विधिमंडळात काय चर्चा होते याकडे वैदभीर्यांचे लक्ष लागले होते. परंतु सकाळच्या सत्रातच सरकारची चर्चा टाळण्याची भूमिका दिसून आली. सोमवारी विधासभेचे कामकाज सुरू होताच विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी या विषयावर चचेर्ची आग्रही मागणी केली. याविषयावर स्थगन प्रस्ताव देखील मांडला. मात्र, अध्यक्षांनी तो फेटाळून लावला.

केवळ निवेदन करण्याची परवानगी दिली व स्थगन प्रस्ताव येईल, त्यावेळी बोलण्याची संधी देऊ, असे विधानसभा अध्यक्षांनी आश्वासन देवून वेळ मारून नेली. याचा निषेध म्हणून काँग्रेससह सर्व विरोधीपक्षांनी सभात्याग केला. विधान परिषदेतही कामगार मंत्र्यानी या घटनेसंदर्भात निवेदन पटलावर ठेवले. चर्चा झाली असती तर स्फोटाची घटना आणि कंपनीच्या सुरक्षितता उपाययोजनेतील कच्चे दुवे पुढे आले असते. विशेष म्हणजे शेवटच्या दिवशी विधान परिषदेच्या कामकाज पत्रिकेत या घटनेवर चचेर्चा विषय समाविष्ट होता. हे येथे उल्लेखनीय.

संसदीय कामकाजाचा दीर्घ अनुभव असणारे थोरात यांनी गत काही वर्षांपासून सभागृहातील बदलेल्या कामकाजाच्या पद्धतीवर भाष्य केले. पूर्वी सदस्यांना बोलण्याची संधी मिळत होती व त्यातून त्यांच्या नेतृत्वाची जडण घडण होत होती. सभागृहातून गेलेले अनेक सदस्य नंतरच्या काळात उच्चपदापर्यंत पोहोचले. आता बोलण्याची संधी कमी मिळते.

पूर्वी विरोधकांसोबतच सत्ताधारी पक्षाचे सदस्यही सरकारच्या उणिवांवर बोट ठेवत असत. आता सदस्य ही हिम्मत दाखवत नसल्याचे दिसून येत आहे, अशी खंत थोरात यांनी व्यक्त केली. या अधिवेशनात अधिकाधिक कामकाजात सहभागी होण्याचे धोरण आम्ही ठरवले होते. यातून सरकारच्या चुका दर्शवण्याचा व त्या लोकांपर्यंत पोहोचण्याचा उद्देश होता. त्यामुळे विविध विषयांवरील चर्चेत सहभागी होऊन आमची मत मांडली. मराठा आरक्षावरील चर्चेत ७० ते ८० सदस्यांनी भाग घेतला, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

सत्ताधाऱ्यांकडून निधी वाटपात भेदभाव

विद्यमान सत्ताधारी निधी वाटपात भेदभाव करीत आहेत. सत्ताधाऱ्यांच्या बाजूने असलेल्या आमदारांना इतका निधी दिला जात आहे की, त्या निधीचे काय करावे असे संबंधित आमदारांना प्रश्न पडावा. तर दुसरीकडे विरोधी पक्षातील आमदारांना निधी दिला जात नाही. राजकारण जरूर करावे, पण विकास कामे होऊ म्हणून निधी न देणे हे जनतेशी बेमाईनी आहे, अशी टीकाही थोरातांनी केली.

विशेष अधिवेशनातून अपेक्षा नाही

मराठा आरक्षणासंदर्भात फेब्रुवारी महिन्यात विशेष अधिवेशन बोलण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली असली तरी त्यातून काही साध्य होईल, असे वाटत नाही. मराठा आरक्षणावरील चचेर्ला मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तरात विशेष नाविन्य नव्हते. त्यांनी केवळ घटनाक्रम मांडला, असे थोरात म्हणाले.

# कर्मचाऱ्याची हत्या करून बँकेवर टाकला दरोडा, स्निफर डॉग आणि 10 वर्षांच्या मुलीमुळे दोन दरोडेखोर गजाआड



**मुंबई। प्रतिनिधी,**

डिसेंबर २०२१ मध्ये मास्क परिधान केलेल्या दोन सशस्त्र दरोडेखोरांनी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या दहिसर (पश्चिम) शाखेत दरोडा टाकला होता. हल्लेखोरांनी एका कंत्राटी कर्मचाऱ्याची गोळी झाडून हत्या केली आणि बँकेतून सुमारे २ लाख ७ हजार रुपये चोरले. या घटनेनंतर अवघ्या चोवीस तासांत पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली. एक स्निफर डॉग आणि १० वर्षांच्या मुलीच्या मदतीने पोलिसांनी या आरोपींना गजाआड केलं. या दोन्ही आरोपींचा जामीन अर्ज दिंडोशी येथील सत्र न्यायालयात प्रलंबित असून त्यावर १ जानेवारी २०२४ रोजी सुनावणी होण्याची शक्यता आहे.

**नेमकी घटना काय?**

'इंडियन एक्स्प्रेस'ने दिलेल्या वृत्तानुसार, '२९ डिसेंबर २०२१ रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास दहिसर रेल्वे स्थानकापासून एक किलोमीटरहून कमी अंतरावर असलेल्या गुरुकुल हाऊसिंग सोसायटीच्या तळमजल्यावरील एसबीआय बँकेत दोन पुरुष घुसले. यावेळी बँकेत 'ग्राहक मित्र' म्हणून काम करणाऱ्या संदेश गोमणे यांना संशय आल्याने त्यांनी दरोडेखोरांना रोखण्याचा प्रयत्न केला. यावेळी एका हल्लेखोराने पुढच्याच क्षणात गोमणे यांच्यावर गोळी झाडली. आरोपीनं काळ्या पिशवीत बंदूक लपवून आणली होती. धर्मेंद्र (वय-२१) आणि त्याचा चुलत भाऊ विकास गुलाबधर यादव (वय-१९) अशी दरोडेखोरांची नावं आहेत. दोघंही उत्तर प्रदेशातील भदोही येथील रहिवाशी असून त्यांनी बँकेतून सुमारे २.७ लाख रुपये लुटले. याप्रकरणी पोलिसांनी तपास करताना ३० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. यामध्ये दोन्ही दरोडेखोर दहिसर पश्चिम आणि पूर्वेला जोडणाऱ्या फूट ओव्हरब्रिजकडे गेल्याचे पोलिसांना आढळून आले.

तसेच दरोडा टाकल्यानंतर एका भावाने पळून जाण्यापूर्वी त्याची चप्पल बँकेच्या आवारात टाकून दिली होती. या चप्पलेच्या आधारे पोलिसांनी स्निफर डॉगच्या मदतीने आरोपी राहत असलेल्या झोपडपट्टीपर्यंत पोहोचले. याचवेळी झोपडपट्टीतील एका १० वर्षीय मुलीने पोलिसांनी संशयिताच्या केलेल्या वर्णनानुसार आरोपी धर्मेंद्रच्या घराचा पत्ता सांगितला. यानंतर पोलिसांनी आरोपी धर्मेंद्र आणि विकास दोघांनाही अटक केली. केटरिंग सर्व्हिसमध्ये काम करणाऱ्या धर्मेंद्रने पोलिसांना सांगितलं की, त्याचे वडील शेतकरी असून त्यांनी साडेचार लाख रुपयांचं कर्ज घेतलं होतं. त्या कर्जाची परतफेड करण्यासाठी हा दरोडा टाकला. याप्रकरणी १ जानेवारी २०२४ रोजी सुनावणी होण्याची शक्यता आहे.

# भाजपाचे राहुल गांधींविरोधात आंदोलन




**नाशिक। प्रतिनिधी,**

तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी उपराष्ट्रपती तथा राज्यसभा सभापती जगदीप धनखड यांची नक्कल करून अशोभनीय वर्तन केले. याप्रसंगी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी भ्रमणध्वनीत चित्रण केले. याच्या निषेधार्थ भाजपाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी तृणमूलचे खासदार कल्याण बॅनर्जी आणि काँग्रेसचे राहुल गांधी यांचा निषेध करून आंदोलन केले. भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी यांच्या नेतृत्वाखाली रविवार कारंजा येथे हे निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी काशिनाथ शिलेदार, सुनील केदार, ॲड. शाम बडोदे, वसंत उशीर, अमित घुगे, अनिल भालेराव, सुजाता करजगीकर, पवन भगूरकर, अविनाश पाटील आदी उपस्थित होते. भारतीय लोकशाहीचे मंदिर असलेल्या संसद भवनाच्या पायऱ्यांवर बॅनर्जी यांनी धनखड यांची नक्कल करुन अशोभनीय वर्तन केल्याचा आक्षेप आंदोलकांनी नोंदविला. राहुल गांधी यांनी या सर्व प्रकाराचे भ्रमणध्वनीत चित्रण केले. बॅनर्जी आणि गांधी यांचा निषेध करून भाजपा कार्यकर्त्यांनी राहुल गांधीच्या पुतळ्याला जोडे मारून निदर्शने केली.

# अवैधपणे वास्तव्य करणाऱ्या बांगला देशीय महिलांवर पोलिसांनी केली कारवाई

**मुंबई। प्रतिनिधी,**

नवघर पोलीस ठाण्याचे हद्दीत अवैधरित्या भारतात प्रवेश करुन राहणारे २ बांग्लादेशी नागरीक नवघर नाका हनुमान मंदीरा जवळ येणार असल्याची माहीती पो. उप.निरी.

माळोदे यांना त्यांचे खास बातमिदारामार्फत माहीती मिळाली. त्यावर नवघर नाका हनुमान मंदीरा जवळ येथे सापळा रचुन २ बांग्लादेशी इसमावर कारवाई करण्यात नवघर पोलीस ठाणे यांना यश मिळाले आहे. सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, मिळाल्यावरून माहीतीवरुन सदर ठिकाणी जावुन सापळा रचुन दोन बांग्लादेशी महिलांना ताब्यात घेतले त्यांना त्यांची नावे विचारले असता त्यांनी त्यांची नावे कोहीनुरबेगम रोजगुल इस्लाम सद्यर वय- ५८ वर्षे, व्यावसाय- घराकाम, राहणार- इंदीरा नगर झोपडपट्टी, मुळगांव बाफेरवाडी, ता. हाजीपुर, जिल्हा-सत्कीरा, राज्य खुलना,देश बांगलादेश व अनुअराबेगम अन्सरअली तोफादर, वय-६०वर्ष, व्यावसाय-घराकाम, रा. इंदीरा नगर झोपडपट्टी, मुळ गांव बाफेरवाडी, ता. हाजीपुर, जिल्हा-सत्कीरा, राज्य खुलना,देश बांगलादेश असे सांगितले त्यांना त्यांचे भारतीय नागरीकत्वाचे कागदपत्र सादर करण्यास सांगितले असता त्यांनी त्याचे कोणतेच कागदपत्र सादर केले नसुन ते मुळ बांग्लादेशी देशाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

वरील दोन्ही आरोपी हे बांग्लादेश या देशाचे नागरीक असुन ते अनैधिकृतपणे पश्चिम बंगाल मार्ग भारतात आलेले असल्याचे त्यांनी सांगितले वरुन सदर आरोपींच्या विरूध्द नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ७६३/२०२३ विदेशी नागरीक अधिनियम १९४६ कलम १४(अ) व परकिय नागरीक आदेश १९४८ ३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उपआयुक्त परिमंडळ १ श्री जयंत बजबळे, सहायक पोलीस आयुक्त नवघर विभाग श्री.उमेश माने यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय पवार, पो. नि.सुशीलकुमार शिदे, स.पो.नि. विशाल धायगुडे, पो.उप.निरी.तुषार माळोदे,पो.हवा.जावळे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

# मालेगाव महापालिकेची तीन गोण्यांमध्ये भरलेली कागदपत्रे रस्त्यावर




**मालेगाव। प्रतिनिधी,**

निवासी जागेचे संरक्षण मिळावे म्हणून छायाचित्र ओळखपत्र (फोटोपास) प्राप्त करण्यासाठी झोपडपट्टीधारकांकडून महापालिकेला सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या तीन गोण्यांमध्ये भरुन ठेवलेल्या फायली रस्त्यावर आढळून आल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला. महापालिका आयुक्त रवींद्र जाधव यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेतली असून चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. काही जागरूक नागरिकांना दुपारी येथील बुनकर बाजाराजवळ असलेल्या रस्त्यावर महापालिकेची कागदपत्रे भरलेल्या गोण्या निदर्शनास आल्या. त्यांनी ही बाब सार्वजनिक नागरी सुविधा समितीचे अध्यक्ष रामदास बोरसे यांना कळवली. बोरसे यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना यासंदर्भात माहिती दिल्यानंतर संकीर्ण कर विभागाचे अधीक्षक रमाकांत धामणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करत कागदपत्रे भरलेल्या तिन्ही गोण्या ताब्यात घेतल्या. तपासणीअंती शहरातील झोपडपट्टी वासियांना संरक्षण देण्यासाठी महापालिकेकडून जे छायाचित्र असणारे ओळखपत्र (फोटोपास) देण्यात येत होते, त्यासाठी झोपडपट्टीवासियांनी महापालिकेकडे सादर केलेल्या प्रस्तावांच्या या फायली असल्याचे उघड झाले. या फायली २००३ मध्ये दाखल केल्याचे आणि त्यावेळी नामंजूर करण्यात आल्या होत्या, असेही आढळून आले आहे.

झोपडपट्टीवासियांना फोटोपास देण्याचे काम नगर विकास विभागाच्या अखत्यारीत येत होते. पूर्वी शिवाजी टाऊन हॉलच्या इमारतीत या विभागाचे काम चालत होते. आता मोडकळीस आलेल्या या इमारतीमधील एका कपाटात कागदपत्रांच्या या फायली गोण्यांमध्ये भरून ठेवण्यात आल्या होत्या. तेथून कुणीतरी चोरी करून रद्दीत विकण्याच्या उद्देशाने या फायली बाहेर नेल्या असण्याची शक्यता आहे. या फायली सांभाळण्याची जबाबदारी कुणाची होती आणि त्या बाहेर कशा गेल्या, याची चौकशी करण्याचे आदेश आयुक्त जाधव यांनी दिले आहेत. दरम्यान,सार्वजनिक नागरी सुविधा समितीच्या शिष्टमंडळाने या संदर्भात आयुक्तांची भेट घेऊन या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

# 'पोपट परत दे, तरच घटस्फोट...', पुण्याच्या कौटुंबिक न्यायालयातील प्रकरण चर्चेत




**पनवेल । प्रतिनिधी,**

नवरा-बायको घटस्फोट घेताना मुलांसाठी किंवा पोटगी मिळावी म्हणून भांडत असतात. अनेकदा घटस्फोटाची प्रकरणे ही त्या त्या कुटुंबासाठी खूप दुःखद अशी असतात. तर कधी कधी घटस्फोटाचे कारण इतके क्षुल्लक असते की, हसू आवरत नाही. पुण्यात घटस्फोटाचे एक वेगळे प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणात पती-पत्नीने संमतीने घटस्फोट घेतला असला तरी एका पोपटामुळे काही काळ घटस्फोट रखडला होता. राजाचा जीव पोपटात.., अशी कथा तुम्ही ऐकली असेल. पण पोपटामुळे घटस्फोट रखडला, असे तुम्ही कधीच ऐकले नसले. पुण्यात आफ्रिकन पोपटामुळे एका दाम्पत्याचा घटस्फोट रखडला होता. पोपट दिल्यानंतरच पती-पत्नी विभक्त होऊ शकले.

**प्रकरण काय होते?**

वकील भाग्यश्री सुभाष गुजर यांनी सदर प्रकरणात पतीची कायदेशीर बाजू हाताळली होती. एबीपी माझा या वृत्तवाहिनीशी संवाद साधताना त्यांनी या आगळ्या-वेगळ्या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली. त्या म्हणाल्या, 'पतीने पत्नीला लग्नापूर्वी आफ्रिकन ग्रे जातीचा पोपट भेट दिला होता. लग्नानंतर काही वर्षांतच दोघांमध्ये वाद निर्माण झाला. अनेक काळापासून दोघांचे पटत नव्हते. त्यामुळे त्यांनी घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता.' वकील भाग्यश्री पुढे म्हणाल्या, '११ डिसेंबर २०१९ रोजी पुण्यातील रजिस्ट्रार कार्यालयात दोघांनीही नोंदणी पद्धतीने लग्न केले होते. मात्र सप्टेंबर २०२१ रोजी लग्नाच्या दोन वर्षांनंतर त्यांच्यात मतभेद होऊन खटके उडू लागले. अखेर पत्नीने विभक्त होण्यासाठी डिसेंबर २०२२ रोजी घटस्फोटाचा अर्ज दाखल केला. यानंतर हे प्रकरण समुपदेशनासाठी पाठिवण्यात आले, तेव्हा एक धक्कादायक बाब समोर आली.'

**अखेर घटस्फोट परत दिला**

दोघंही एकमेकांसह यापुढे एकत्र राहण्यासाठी इच्छुक नसल्याचे लक्षात आल्यानंतर घटस्फोट घेण्याचा निर्णय झाला. पती आणि पत्नी त्यासाठी तयारही होते. पत्नीने पोटगीची मागणी न केल्यामुळे दोघांच्या संमतीने घटस्फोट होईल, असे वाटत असतानाच 'लग्नापूर्वी आपण भेट दिलेला आफ्रिकन ग्रे पोपट परत करावा', या मागणीवर पती अडून बसला. तर पत्नी पोपट द्यायला तयार नव्हती. पुन्हा समुपदेशन केल्यानंतर पत्नीने पोपट परत करण्याचे मान्य केले आणि त्यानंतर घटस्फोट मंजूर झाला, अशी माहिती भाग्यश्री गुजर यांनी दिली.

# तांबड्या समुद्रात हुती बंडखोरांचा हल्ला, सामुद्रधुनीचा मोक्याचा मार्ग बंडखोरांनी रोखला

**डहाणू। प्रतिनिधी,**

जागतिक सागरी वाहतुकीतील एक महत्त्वाचा व्यापारमार्ग असलेल्या तांबड्या समुद्रामध्ये सध्या हूती बंडखोरांच्या हल्ल्यांमुळे मोठा भडका उडाला आहे. चार दिवसांपूर्वी एमव्ही रुनेम या माल्टाच्या जहाजाला तेथील हूती बंडखोरांनी लक्ष्य केल्यावर भारतीय नौदलाने आपली युद्धनौका व गस्तीविमान या नौकेच्या रक्षणार्थ धाडली. सध्याचे समुद्री हल्ल्यांचे प्रकरण हे यापूर्वीच्या चाचेगिरीसारखे नसून त्यास इस्त्रायल-हमास युद्धाचा संदर्भ आहे. सध्याच्या हल्ल्यांमुळे तेलांच्या किमतीत वाढ होण्याचे संकट उद्भवणार आहे. सोमाली चाच्यांनी अरबी समुद्र तसेच एडनच्या आखातावळच्या मार्गावर सन २००८ ते २०१२ या काळात उच्छाद मांडला होता. हे चाचे थेट लक्षद्वीपर्यंतही मजल गाठू लागले होते. एखाद्या छोट्या डिंगी बोटीतून येऊन मोठ्या जहाजांवर ते हल्ला करीत व जहाजांच्या सुटकेसाठी परदेशात बसलेल्या खंडणीखोरांना मोठी रक्कम देणे भाग पडत असे. गेल्या काही दिवसांतले हल्ले हे सोमाली चाचेगिरीसारखे नाहीत. ते येमेनमधील हूती बंडखोरांकडून सुरू झाले असून त्यात रॉकेट, क्षेपणास्त्रे आणि ड्रोन्स यासारखी अद्ययावात शस्त्रास्त्रे वापरण्यात येत आहेत. १८ डिसेंबरला गॅलेक्सी लीडर या मोटार वाहतूक करणाऱ्या जहाजावर तर एमआय १७ या लष्करी हेलिकॉप्टरद्वारे शस्त्रधारी बंडखोर उतरले. मर्स्क जिब्राल्टर या जहाजावर क्षेपणास्त्राचा हल्ला झाला. हूती ही येमेनी बंडखोरांची संघटना असून त्यांना इराणकडून शस्त्रपुरवठा होतो. येमेनमधील सना या राजधानीसह उत्तरेकडील बहुतांश भाग २०१४ पासून त्यांच्या अधिपत्याखाली आहे. सौदी अरेबियामधील सुन्नी सत्ताधीशांच्या विरोधात ते गनिमी युद्ध खेळले होते. २०१४ मध्ये येमेनमध्ये झालेल्या यादवीच्या काळात त्यांचे महत्त्व वाढले. हूती बंडखोर हे अमेरिका आणि इस्त्रायलचा तिरस्कार करतात. नेमक्या याच कारणामुळे सध्या इस्त्रायलकडे जाणाऱ्या जहाजांचा किंवा अमेरिकी व इस्त्रायली जहाजांचा मार्ग रोखण्यास त्यांनी सुरुवात केली आहे. गाझा पट्टीत औषधे व जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीतपणे मिळाला नाही, तर आम्ही तांबड्या समुद्रातील सर्व जहाजांवर हल्ले करू, असा इशारा त्यांनी दिला आहे.

मोक्याच्या जागेवर नाकेबंदी

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 1, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, गजाराम को. ऑ.हौ.सो. वंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत) संपर्क:-9594418181 / 8424989898